सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.२५७ ठ. क्र. २४४
दि. ३१/१०/२०१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

२७७

सोलापूर महानगरपालिकेकडून स्मार्ट सिटी चॅलेंज प्रस्ताव तयार करणेकरिता क्रिसील रिस्क ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर सोल्युशन लिमिटेड यांना सल्लागार म्हणून नेमणेस व त्यांचेकडेन प्रस्ताव तयार करुन घेणेस, मा.स्थायी समिती ठ.क्र. ३५७ दि. २३-९-२०१५ ने मान्यता दिलेली आहे. याप्रमाणे मा.केंद्र शासनाच्या निकषानुसार सोलापूर शहराकरिता स्मार्ट सोल्युशन उपाय १) कोअर इन्फ्रास्ट्रक्चर २) क्लिन ॲन्ड सस्टेनेबल एन्वायरमेंट ३) स्मार्ट सोल्युशन ४) राहणीमान स्तर उंचाविणे , वर नमूदसाठी स्मार्ट सोल्युशनचा वापर करुन स्मार्ट सिटी चॅलेंज प्रस्तावाचा आराखडा दिनांक ३-१२-२०१५ अखेरपर्यंत केंद्र शासनास सादर करणेच्या सूचना आहेत. याप्रमाणे मा.आयुक्तांचे दि. २७-१०-२०१५ चे प्रस्तावात नमूद प्रमाणे टिपणीस, क्षेत्र निवडीचा पर्याय जनसंवादातून स्मार्ट सिटी प्रपोजल बनविण्यासाठी व लोकसहभागातून जनमताने स्मार्ट सिटी प्रपोजल तयार करणे व प्रस्तावातील नमूद वस्तुस्थितीचा विचार होऊन सदर योजनेअंतर्गत क्षेत्र विकास निवडीकरिता उक्तकामी तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याने मा.आयुक्त यांचे दिनांक २७-१०-२०१५ व २८-१०-२०१५ चे टिपणीप्रमाणे मान्यता देणेकामी ,मुदतीत महासभेची विशेष सभा बोलावून ठराव पारित करणेकामी आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

स्मार्ट सिटीसाठी क्षेत्रविकास निवडीचा पर्याय जनसंवादातून व शहरातील नागरिकांची मागणी, मते, व प्राधान्यक्रमांचा विचार करुन घेणेस मा.आयुक्त यांना अधिकार देणेस ही सभा मान्यता देत आहे व मा.आयुक्त यांनी याबाबत वेळोवेळी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अवगत होणेकामी मा.सर्वसाधारण सभेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(signature)
प्र नगरसचिव
सोलापूर महानगरपालिका

०/c.